Janata Shikshan Mandal’s, Sane Guruji Vidya Prabodhini,
Comprehensive College of Education, Khiroda. Tq. Raver Dist.Jalgaon-425504

Prof. Dr. B. J. Mundhe

Janata Shikshan Mandal’s, Sane Guruji Vidya Prabodhini,

Comprehensive College of Education, Khiroda.

Tq. Raver Dist. Jalgaon-425504

# PE-3 Language Across the Curriculum, Knowledge and Curriculum

बोलणारा व ऐकणारा हे संदेशन प्रक्रियेतील दोन प्रमुख घटक आहेत. त्यातील ऐकणारा या घटकाशी श्रवण कौशल्याचा संबंध आहे. त्याच्या व्याख्या पुढीलप्रमाणे-

- शाब्दिक किंवा अशाब्दिक उद्दीकांव्दारे सूचित अर्थाचे ग्रहण करणे म्हणजे श्रवण होय.
- बोलणा-या व्यक्तिने उच्चारलेल्या भाषेतील शब्द व अर्थ यातून सूचित होणारा विचार समजून घेणे म्हणजे श्रवण होय.
- शाब्दिक किंवा अशाब्दिक संदेशातून मिळणा-या माहितीचे किंवा विचारांचे आकलन करण्याची प्रक्रिया म्हणजे श्रवण होय.

वरील व्याख्या लक्षात घेता श्रवण कौशल्याचे स्वरूप स्पष्ट होते.

श्रवणकौशल्य विकसित करणारी तत्त्वे किंवा आवश्यक क्षमता पुढीलप्रमाणे:-

- मनाची एकाग्रता विकसित करणे.
- भिन्न भिन्न ध्वनी व शब्दांना एकसाथ ऐकणे.
- अवधान देऊन ऐकणे व त्याचा अर्थ समजून घेणे.
- बोलणा-याच्या विचारातील आशय समजून घेणे.
- आकलन झालेल्या माहितीवर सकारात्मक विचार करणे.
- एकदम निष्कर्षाप्रत न पोहचता विचारपूर्वक प्रतिसाद देणे. वक्त्याच्या बोलण्यातील व्यंग, लक्ष्यार्थ समजणे.
- पूर्वग्रह व गृहितकृत्ये लक्षात घेऊन श्रवण न करणे.
- शाब्दिक व अशाब्दिक उद्दीपकांतील फरक ओळखणे. उदाहरणार्थ महाविदयालयातील व देवळातील घंटेचा नाद ऐकल्यावर योग्य अर्थ ग्रहण करणे.
- ऐकताना स्तब्धता व संयम राखणे, एखादा विचार पूर्ण श्रवण केल्यावर प्रतिसाद देणे.
- श्रवण करतांना ऐकणा-याने विवेकाचा स्वीकार करावा. एखादी गोष्ट आवडली नाही तर त्यास विवेक वृत्तीने प्रतिसाद घ्यावा म्हणजे संघर्ष टाळता येतो.

श्रवण कौशल्याचे फायदे:-

श्रवण कौशल्यांच्या विकासाला वरील तत्त्वे सहायभूत ठरणारी आहे. त्यामुळे व्यक्तिमनाचा सकारात्मक विकास होतो. परस्परांशी उत्तम संवाद साधता येतो, सामाजिक - शैक्षणिक - सांस्कृतिक कार्यालयीन स्तरावर चांगल्या श्रवण कौशल्यामुळे परिणामकारक जीवन जगता येते. आपले व्यक्तिमत्त्व प्रभावी होते. इतरांचे विचार व त्यांच्या समस्या त्यांच्या भूमिकेतून समजून घेण्याची क्षमता विकसित होते. श्रवण कौशल्याच्या पायावरच भाषिक सक्षमतेची इमारत उभी राहते. श्रवणात निपुणता असल्याशिवाय भाषण, वाचन, लेखन, संप्रेषण यात निपुणता प्राप्त होत नाही.

श्रवणकौशल्याचा वापराने व्यक्तिमत्वविकास साधता येतो. श्रवणकौशल्यामुळे आपणाला ज्ञान मिळते. याबरोबर विषयाची आवड, आनंद, श्रमपरिहार, ज्ञानवृध्दी, विचारांची देवाण -घेवाण या गोष्टी अवगत होतात. तसेच आपल्या ध्येयपूर्तीसाठी आपण श्रवणकौशल्याचा वापर करतो. आपला व्यक्तिमत्त्व विकास व्हावा, सामाजिक, कौटुंबिक प्रश्नांची सोडवणूक व्हावी म्हणून आपण श्रवणकौशल्ये जोपासली पाहिजेत.

## श्रवणातील अडथळे:-

श्रवण प्रक्रियेत आपणाला अनेक प्रकारचे अडथळे जाणवतात. वक्ता आणि श्रोता यांच्यामध्ये योग्य प्रकारे संवाद राहण्यासाठी अडथळे दूर करणे महत्त्वाचे आहे. ध्वनींचे वहन योग्य प्रकारे होत नसेल तर श्रवणप्रक्रियेत अडथळा येतो. किंवा सभोवती गडबड - गोंधळाचे वातावरण असेल तरी श्रवणात अडथळा निर्माण होतो. तसेच वक्ता अधिक जोरात व अधिक सावकाश बोलत असेल तरी श्रवण करण्यास अडचण होते. शब्द, वाक्य यांचा स्पष्ट उच्चार होत नसेल, वक्त्याच्या उच्चारात सुसूत्रता नसेल, विषय न आवडणारा असेल, परिचित विषयावर वक्ता बोलत असेल या घटकांमुळे श्रवण प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. श्रवण करताना आपली मानसिकता ठीक नसेल किंवा शारीरिक काही त्रास होत असेल तर श्रवणात अडचण निर्माण होते.

## १.२.२ भाषण कौशल्य (Speaking Skill)

ब्राऊन - बोलणे ही अर्थरचना करण्याची अशी आंतरक्रियात्मक प्रक्रिया आहे. ज्यात निर्मीती आणि ग्रहण व माहिती प्रक्रियाकरण समाविष्ट आहे.

(Speaking is an interactive process of constructing meaning that involves producing and receiving and processing information.)

ऑक्सफर्ड डिक्शनरी - माहिती व्यक्त करणे अथवा एखादयाच्या भावनांचे प्रकटरित्या अभिव्यक्ती करण्याची प्रक्रिया म्हणजे बोलणे/ भाषण होय.

(The action of conveying information for expressing ones feeling in speech.- Oxford Dictionary)

मौखिक अभिव्यक्तीची रूपे

१. औपचारिक (Formal)

२. प्रासंगिक (Informal)

३. संवाद (Converesation)

४. विवेचन (Narration)

५. चित्रण (Description)

६. भाषण (Speech)

७. इतिवृत्त (Report)

## १.२.२ भाषण कौशल्ये: अर्थ व व्याख्या

- समूहापुढे विचारप्रवर्तक बोलणे म्हणजे भाषण होय.
- लोकसमूहाला एकाचवेळी समर्पक भाषेत वैचारिक प्रबोधन करणे म्हणजे भाषण होय.
- वाक्‌इंद्रियाव्दारा ध्वनी, शब्द, वाक्य साधारणपणे बोलणे, उच्चारण व प्रसंगानुरूप वाक्यांचा उपयोग म्हणजे भाषण होय.

चांगल्या भाषणाचे गुणविशेष पुढीलप्रमाणे-

- विषयाची समर्पकरित्या केलेली मांडणी.
- आशयातील सुस्पष्टता व मूल्यधिष्ठित जीवनदर्शन.
- उच्चारणातील शुद्धता व शब्दांची चढउतार व्दारा आशयाची मांडणी.
- समर्पक उदाहरणाव्दारे मुद्देसुद विषय विवेचन.
- शब्दाची समर्पक निवड व अर्थपूर्ण निवेदन.
- श्रोत्यांना विचार करावयास प्रवृत्त करणारे अनुभव कथन.
- प्रभावी भाषाशैली.
- श्रोत्यांच्या मनाची पकड घेत परिणामकारक शेवट.

भाषण कौशल्याचे तत्त्व :-

- **विचार तत्त्व :-** बोलण्याचे विचार स्पष्ट असले पाहिजेत. त्यात प्रसंगानुकूलता असावी.
- **शैलीतत्त्व** :- विचारांची अभिव्यक्ती प्रभावपूर्ण शैलीत प्रवाही भाषेत करणे.
- **भाषातत्त्व** :- विचार व्यक्त करण्यासाठी योग्य शब्द, वाक्य, उच्चारण, विरामचिन्हे यांचा वापर करणे.

➢ **भाषणकौशल्यात भाषेचे स्थान :-**

भाषणकौशल्य आत्मसात होण्यासाठी वक्ता व श्रोता यांना एक सामाईक भाषा अवगत असणे महत्त्वाचे आहे. भाषा क्षणिक गरज भागविण्यापुरती नाही तर तिला अधिक अर्थवाहक, आशयपूर्ण व कार्यक्षम बनविता येते. भाषेला सौंदर्य प्राप्त करून देणारे अलंकार, सुभाषिते, म्हणी यांचे ज्ञान वक्त्याजवळ असेल तर भाषण ओघवते व रसाळ होते.

### १.२.३ वाचन कौशल्ये:- (Reading Skill)

- प्रस्तावना:-

वाचन ही संवेदनात्मक व मानसिक प्रक्रिया आहे. त्यामध्ये डोळा आणि मन हे घटक गुंतलेले असतात. वाचन हे मूक व प्रकट असे दोन्ही स्वरूपाचे असते. वाचनातून आशय ग्रहण केला जातो. वाचनातून अध्ययन होते. छापलेल्या अथवा लिहिलेल्या शब्दांचा अर्थ समजून घेणे म्हणजे वाचन.

- अर्थ व व्याख्या:-

१. लिखित अथवा छापील चिन्हांचे अर्थान्वेषण कारणे.

२. वाचन सर्व संकेतांचे अथवा चिन्हांचे अर्थ निर्वाचण केलेले असते, जे कशाचे तरी प्रतिनिधित्त्व दर्शवितात असे गृहीत धरलेले असते.

३. नैसर्गिक चिन्ह व संवादाचे संकेत या स्त्रोतांतील चेतकांमध्ये बौद्धिक पातळीवर समायोजन साधणारी प्रक्रिया म्हणजे वाचन होय. अर्टली (Artly) यांनी वाचनाची व्याख्या करताना म्हटले आहे की, वाक्य उतारा यांच्यातून मोठया कौशल्याने सूक्ष्म अर्थाचे सूत्र काढणे आणि आपल्या व्यक्तिमत्त्वात त्याची गुंफण करणे म्हणजे वाचन होय.

## वाचन कौशल्याची उद्दिष्टे:-

- संस्कृती व परंपरेची ओळख करणे
- जिज्ञासा आणि कुतूहलपूर्ती करणे
- कल्पनाशक्तीचा विकास करणे
- लेखकाची भूमिका समजून घेणे
- शब्दसंग्रहाचा विकास करणे
- बहुश्रुतता निर्माण करणे
- रसग्रहण क्षमतेचा विकास करणे
- वाचनकौशल्याशी संबंधित अन्य कौशल्ये विकसित करणे

**नोट:-** वरील उद्दिष्टांच्या आधारे वाचन कौशल्याचे फायदेही स्पष्ट करता येतील.

## १.२.४ लेखन कौशल्य (Writing Skill)

- विषय प्रवेश :- व्यावहारिक जीवनात भाषेचा विविध स्तरावर आपण वापर करतो. पत्रलेखन, कार्यालयीन लेखन, अध्ययन -अध्ययन क्षेत्रातील लेखन, वृत्तपत्रीय लखन, ग्रंथलेखन इत्यादी आपल्या परिचयाचे क्षेत्रात त्याचा आपण अनुभव घेतो. या विविध स्तरावरील भाषिक रचना छापील किंवा मुद्रित स्वरूपात असते. त्यासाठी शुद्धलेखनाचे नियम व व्याकरणिक नियमांचा आधार घेतलेला असतो. त्यामुळे लेखनाचा एक वेगळे स्वरूप प्राप्त होते. लेखन हे आपल्या विचारांचे मूर्त स्वरूप असते.

अध्यपन प्रक्रियेत वाचनाप्रमाणेच लेखन कौशल्य महत्त्वाचे आहे. ते प्रयत्नसाध्य आहे. जाणीवपूर्वक ते आत्मसात करून लेखनाच्या क्षेत्रात आपले वेगळेपण सिद्ध करता येते. पत्रलेखन, कार्यालयीन लेखन, अध्ययन -अध्ययन क्षेत्रातील लेखन, वृत्तपत्रीय लेखन, ग्रंथलेखन, इत्यादी आपल्या परिचयाचे क्षेत्रात त्याचा आपण अनुभव घेतो. कोणतेही लेखन हे हेतूपूर्ण असते. त्यानुसार लेखनाचे स्वरूप बदलते. लेखन कोणतेही असो त्याचे मांडणीचे तत्त्व ठरलेले असते.

**अर्थ व व्याख्या :**

- मनातील विचारांचे अक्षररूप म्हणजे लेखन होय.
- आशयाची मूर्तरूपाने केलेली मांडणी म्हणजे लेखन होय.
- अक्षरांच्या माध्यमातून परस्परांशी साधलेला संवाद म्हणजे लेखन होय.

## चांगल्या लेखन कौशल्यासाठी आवश्यक बाबी

- विषयाचे पूर्ण ज्ञान.
- काय लिहावयाचे याविषयीची स्पष्टता.
- शुद्धलेखन नियमांचा परिचय.
- शब्दसंग्रहाची विपूलता.
- समर्पक शब्दांची निवड करण्याची क्षमता.
- मनाची एकाग्रता.
- सुंदर हस्ताक्षर - त्यासाठी लेखनाचा सराव.
- योग्य पद्धतीने विचार मांडण्याची क्षमता, नेमकेपणा.
- भाषेवरील प्रभुत्त्व.
- व्याकरणिक नियमांचा परिचय.

# लेखन कौशल्याचे प्रकार

१. **अनुलेखन** : एखादया विचारप्रवर्तक उतारा निवडून तो पाहून- पाहून लिहिणे म्हणजे अनुलेखन होय.

२. **श्रुतलेखन** : शिक्षिकाने एखादा विचारप्रवर्तक उतारा वाचावा. विद्यार्थ्यांनी ऐकून लक्षपूर्वक त्याचे लेखन करणे म्हणजे श्रुतलेखन होय. हे लेखन पूर्ण झाल्यावर त्याचे शुद्धलेखन तपासा. त्यातील चूका शोधा. त्या दुरूस्त करा अशा लेखनामुळे विद्यार्थ्यांची भाषिक लेखन क्षमता विकसित होते.

३. **अभिव्यक्ति लेखन :** स्वत: विचार करून केलेले लेखन म्हणजे अभिव्यक्ति लेखन होय. यात पत्रलेखन, साहित्यातील कथा, कादंबरी, काव्य इत्यादी प्रकारांसाठी केलेले लेखन, निबंधलेखन, वैचारिक लेखन इत्यादींच्या समावेश करता येतो.

**लेखन कौशल्य विकसनासाठी पूरक घटक**

- आशय किंवा विषयाची निश्चिती करणे.
- मनात त्या विषयाचे चिंतन करणे.
- आशयाशी संबंधित इतर पुस्तकांचे वाचन करणे. त्यातून विचारांना पूरक ठरतील असे मुद्यांचे टिपण तयार करणे.
- मनातील विचारांची सुसूत्र मांडणी करणे.
- शुद्धलेखनाचे नियम, व्याकरणिक व्यवस्थेचा आधार घेणे.
- समर्पक शब्दांची निवड करणे.
- कल्पित उदाहरणांचा आधार घेणे.
- लेखनाचा परिणामकारक शेवट करणे.

## १.२.५ संप्रेषण कौशल्य (Communication Skill)

- विषय प्रवेश : इंग्रजी शब्द (Communication) म्हणजे संप्रेषण, संवाद, संज्ञापन, संदेशन. दळणवळण मूळ शब्द Communis हा लॅटिन शब्द आहे त्याचा अर्थ समान किंवा सामाईक त्यावरून Communication म्हणजे सामाईक अनुभव असे म्हणता येते इंग्रजीत Communication शब्दाचा अर्थ to give so as to have in common म्हणजे ही दोन व्यक्तींमध्ये घडणारी त्या दोघांना समान धाग्याने जोडणारी अन्योन्य (Mutual) संपर्क प्रक्रिया आहे.

परस्पर सामंजस्याच्या भावनेतून कल्पना, भावना यांची देवाणघेवाण करणे.

एका व्यक्तीकडून माहिती, कल्पना व अभिवृत्ती दुस-या व्यक्तीला प्रसारित करण्याची कृती.

माहिती, मते किंवा कल्पना यांची लिखित मौखिक किंवा दृश्य माध्यमांच्या साह्याने देवाणघेवाण करणे की ज्यायोगे या गोष्टी प्रत्येक संबंधिताला पूर्णपणे आकलन होतील अशाप्रकारे प्रसारित करणे म्हणजे संप्रेषण होय.

माणसाच्या संज्ञापनाच्या गरजेतून वेगवेगळे शोध लागत गेले. आज आपण संप्रेषण क्रांतीच्या युगात आहोत. आपण शब्दांनी, चिन्हांनी किंवा हावभावांनी एकमेकांशी संवाद साधत असतो. संदेशनात मानवी मुखावाटे उच्चारला जाणारा ध्वनी हा भाषेचा आरंभबिंदू आणि सूचित आशय हा भाषेचा अखेरचा टप्पा होय. ध्वनिरूप संकेतांची निर्मिती ते त्यांची सार्थ स्वीकृती हे भाषेचे प्रत्यक्ष क्षेत्र आहे. दैनंदिन व्यवहारातील संवाद हे सहज आणि उत्स्फूर्त असतात. संवाद वा संभाषण ही जीवन जगण्याची एक कला आहे. ही कला प्रत्येकाला भाषेच्या अभ्यासाने साध्य करता येते. चांगले बोलणे व चांगले लिहणे हे सर्वस्तरावरील संदेशनात महत्त्वाचे असते.

# १.३ विद्यार्थ्यांची भाषिक आणि साक्षरता पार्श्वभूमी (Language and Literacy Background of Students)

**भाषिक पार्श्वभूमी**

- विद्यार्थ्यांची कुटुंबाशी होणारी आंतरक्रिया
- बोली भाषा
- पालक व्यवसायानुसार भाषा
- सभोवतालची भाषिक परिस्थिती
- कुटुंबाच्या सामाजिक आर्थिक स्तरानुसार भाषा
- सामाजिक भिन्नतेचा व विविध घटनांचा प्रभाव
- प्रसार माध्यमे
- नैसर्गिक वातावरणाचा प्रभाव

# विद्यार्थ्यांची साक्षरता पार्श्वभूमी (Literacy Background of Students)

साक्षरता केवळ भाषा लिहिण्यावाचण्याशी संबंधित नाही तर विज्ञानातील नवनवीन शोधामुळे त्यांच्याशी संबंधित साक्षरतादेखील त्यात अभिप्रेत आहे. उच्च शिक्षण घेतलेल्या पालकांची शैली विद्यार्थी विकासास पोषक ठरते. ते मुलांना उच्च दर्जाची शाब्दिक आंतरक्रियेसाठी गुंतवून ठेवतात. मुलांना इच्छित उच्च शिक्षण देण्यासाठी शाळेत शैक्षणिक संपादनाच्या उच्च अपेक्षा ठेवतात. विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर पालकांच्या अंधश्रद्धा, विश्वाला आणि वर्तनाचा परिणाम होतो. ज्यास्त शिक्षित पालक मुलांना असे वातावरण परिस्थिती पुरवतात ज्यामुळे त्यांच्या मुलांच्या संधी आणि निर्णय प्रक्रियेत सुधारणा होईल.

➢ **विद्यार्थ्यांची साक्षरता पार्श्वभूमी**

- सामाजिक रूढी व परंपरांपुढे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते.
- कुटुंब पूर्णपणे निरक्षर
- कुटुंबातील काही व्यक्ती साक्षर
- संपूर्ण कुटुंब साक्षर
- पालक अशिक्षित पण पालकाच्या शिक्षणाची आवड
- दुर्गम भाग शाळा उपलब्ध नसणे
- प्रगत समाजातील शैक्षणिक आस्थेचे वातावरण
- कुटुंबातील उच्च शिक्षक पालक
- मुलाच्या बालपणातच साक्षरतेची सुरवात करणारे पालक

## १.४ वर्ग खोलीतील आंतरक्रियेवर भाषेचा परिणाम (Influence of Language on Classroom Interactions)

संप्रेषण प्रक्रियेसाठी किमान दोन व्यक्तीमध्ये आंतरक्रिया घडणे आवश्यक असते. ज्या चिन्हे किंवा भाषिक नियम समजून घेतात. आंतरक्रिया म्हणजे परस्परपूरक घटना ज्यात कमीत कमी दोन व्यक्ती किंवा दोन कृतीची आवश्यकता असते. जेव्हा असे दोन उद्देश किंवा प्रसंग नैसर्गिकरित्या एकदुस-यावर प्रभाव टाकतात तेव्हा आंतरक्रिया घडते.

➢ वर्गखोलीतील आंतरक्रियेचे प्रकार:

१. विद्यार्थी - विषयातील आशय आंतरक्रिया (Leaner-Course Content)

२. विद्यार्थी - विद्यार्थी आंतरक्रिया (Leaner-Leaner)

३. विद्यार्थी - शिक्षक आंतरक्रिया (Leaner-Teacher)

४. विद्यार्थी - तंत्रज्ञान आंतरक्रिया (Leaner-Technology)

## वर्गातील आंतरक्रियेत शिक्षकाची भूमिका

१) नियंत्रक (Controller)

२) सल्लागार (Assessor)

३) दुरूस्ती (Correcter)

४) संघटक  (Organizer)

५) प्रेरणा देणारा (Prompter)

६) आधार / स्त्रोत (Resource)

७) निरीक्षक (Observer)

## प्रकरण दुसरे: भाषा आणि अध्ययन (Language and Learning)

२.१ मातृभाषेद्वारा अन्य भाषेचे अध्ययन मातृभाषेतील कौशल्य संपादन / ग्रहण

(Language learning-from mother tongue to other tongue-Skill acquired in mother tongue)

- **मातृभाषा संपादनाचा क्रम**

१. इतरांचे बोलणे, ऐकणे, ते समजणे, त्यातील ध्वन्यार्थ संबंध लक्षात येणे ही भाषिक प्रक्रियेतील पहिली घटना असते.

२. स्वरयंत्राचा वापर करून, ध्वन्यार्थ संबंध लक्षात घेऊन मुखावाटे भाषिक रचनांचा उच्चार करणे ही भाषिक प्रक्रियेतील दुसरी घटना असते.

३. शब्दसंग्रह वाढविणे, विविध भाषिक रचना जाणून घेवून त्यामागील मूलभूत नियमव्यवस्था समजावून घेणे ही या प्रक्रियेतील तिसरी घटना असते.

- **अन्य भाषा अध्यपनाचे महत्त्व**

वेगवेगळया भाषांमधील उत्तमोत्तम साहित्याचा परिचय करून घेण्यासाठी अभ्यासक अन्य भाषा शिकतात. भारतातील नागरिकांनी राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने मातृभाषेशिवाय एक तरी परप्रांतीय भाषा शिकावी, अशी अपेक्षा त्रिभाषा सूत्रातदेखील दिसते. जागतिक दळणवळणही दिवसेंदिवस वाढते आहे. परराष्ट्रांशी राजकीय, सांस्कतिक व आर्थिक संबंध प्रस्थापित करणा-या विविध संस्थांमध्ये काम करण्यात अनेक व्यक्ती गुंतलेल्या असतात. त्यांना अन्य भाषा शिकणे हे अत्यावश्यकच असते. दुभाषा म्हणून काम करणा-या व्यक्तीला तर निदान दोन भाषांचा उत्तम परिचय असावाच लागतो.

## (Tounge) भाषिक कौशल्य अर्जितता ( Skill Acquired in Mother

अन्य भाषा शिकताना त्या भाषेच्या व्यवस्थेचे ज्ञान मिळविणे आवश्यक असते. स्वभाषा आपल्याला कुटुंबातून सहजपणे अर्जित करता येते. त्या वेळी, या मातृभाषेतील व्यवस्थेचे ज्ञान आपल्याला असते. अन्य भाषेचा वा दुस-या भाषेचा उपयोग बोलण्यात व लिहिण्यात करावयाचे शिकत असताना मातृभाषेच्या सवयींचा प्रभाव अटळ असतो. अन्य भाषा शिकताना तिच्यातील विशिष्ट ध्वनी, शब्दरचना, त्यांचे अर्थ, शब्दांना लागणारे प्रत्यय, वाक्यरचना इ. गोष्टींची माहिती करून घ्यावी लागते.

- अन्य भाषेचे अध्यापन आणि अध्ययन जास्तीत जास्त परिणामकारक होण्यकरीता पुढील काही मानसशास्त्रीय तत्त्वे लक्षात ठेवली पाहिजेत.

१. दुसरी भाषा शिकणा-याला एक भाषा येत असते माहीत असलेले अनुभव आणि आशय दुस-या भाषेत व्यक्त करण्याकरीता लागणारा शब्दसंग्रह आणि रचनापद्धती मात्र नवीन म्हणून शिकावी लागते.

२. ह्या नवीन घटकांचा वापर करण्याचे सामर्थ्य उपयोग करून मिळविता येतेय, त्याच्याबद्दल निव्वळ माहिती मिळवून ते सामर्थ्य येत नाही. भाषेवरील सामर्थ्य भाषेचा वापर करूनच मिळवता व वाढविता येते. भाषेच्या व्याकरणाचे नियम निव्वळ पाठ करून भाषा येत नाही.

३. भाषा वापरणे हे एक कौशल्य आहे.

४. हे कौशल्य बाणविणे म्हणजे काही विशिष्ट सवयी बाणविणे होय.

## २.२ भाषा आणि अध्ययन: (Language and Learning-the Responsibilities of the Subject Teacher)

- सर्व विषयांचे अध्ययन भाषेच्या आधारे होते. म्हणून सर्व प्रकारच्या अध्ययनात भाषा ही मध्यवर्ती ठिकाणी असते. या दृष्टीने शिक्षकाची जबाबदारी मोठी आहे. ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. महाराष्ट्र राज्यात मातृभाषा मराठीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रथम भाषा म्हणून अभ्यासक्रमात तिचे सर्वात अग्रस्थानी स्थान आहे. परंतु महाराष्ट्रातच हीच मायबोली वेगवेगळया बोलीभाषेचे स्वरूप बनून वेगवेगळी बोलली जाते.

२. मातृभाषेतील बोलीभाषांमधील एकच शब्द वेगवेगळया नावाने ओळखला जातो. त्यामुळे देखील ज्ञान आकलनात्मक पातळीवर अडचण निर्माण होते. उदा. पाणी साठवण्याचे मोठे भांडे यालाच - पिप, पिप, टिप, पंचपात्री अशी विविध नावे.

३. बोलीभाषा या प्रमाणभाषेचे झरे आहेत. शैक्षणिक दृष्टया मातृभाषा म्हणजे प्रमाण भाषा हे शिक्षकाने लक्षात घ्यावे.

४. मूल जेव्हा शाळेत येते तेव्हा शिक्षक हा प्रमाणभाषेचा प्रतिनिधी म्हणून त्याच्यासमोर येतो.

५. मराठी समाजाची भाषा. त्या समाजात लोक जे दैनंदिन विचार विनिमयाचे साधन म्हणून वापरतात त्यांचा अभ्यास केला म्हणजे मराठी भाषेच्या ख-या स्वरूपाचा अभ्यास होणार आहे.

६. आज बोलींचा अभ्यास हा मातृभाषा शिक्षणातील हल्लीच्या समस्या निरनिराळया बोली आणि पाठ्यपुस्तकातील भाषा यांचा समन्वय, व्दिभाषिक पद्धतीचे शिक्षण इत्यादी गोष्टीचा विचार करण्यासाठी होणे आवश्यक आहे.

७. जर अध्यापन ही एक कला आहे. तर शिक्षक हा एक कलावंत आहे. हे मान्य करावे लागेल.

८. भाषा आणि अध्ययन या दोन्ही बाबींना समजून घेण्याची जबाबदारी भाषा शिक्षकांची आहे त्यासाठी त्यांचे भाषा व अध्ययन प्रक्रिया दोघांवरही प्रभूत्त्व असावे.

९. मातृभाषा ही माध्यमाची भाषा असल्यामुळे त्याचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांकडून झाला पाहिजे.

१०. भाषेचे स्वरूप शिक्षक साहित्यातील प्रतिनिधिक स्वरूपात पाठ्यपुस्तकांत समाविष्ट केलेल्या उता-यांच्या आधारे करीत असतो.

**क्रमशः**

११ भाषा शिकविणा-या शिक्षकाला त्या त्या भाषेविषयी अभिमान नसेल तर विद्यार्थ्यांच्या मनावर भाषेचे संस्कार कसे होणार

१२ बालकाच्या सर्वांगीण विकासाचा आणि मातृभाषेच्या अध्ययन अध्यपनाचा घनिष्ठ संबंध आहे.

१३ व्यासंग म्हणजे एखाद्या विषयाचा सतत अभ्यास करणे होय. सतत अभ्यासाने ज्ञान नित्य ताजे राहते.

१४ वक्ता दशसहस्त्रेषु या उक्तीप्रमाणे वक्ता तसा दुर्मीळ असला तरी भाषेचा शिक्षक हा त्या दुर्मीळ व्यक्तीपैकी असला पाहिजे.

१५ स्व भाषेसोबत अन्य भाषांचे ज्ञान मिळवणे - एका भाषेच्या शिक्षकाला अन्य भाषांचे ज्ञान असले पाहिजे.

१६ अभिनयक्षमता - अभिनय क्षमता म्हणजे आवाजातील चढउतार, भावोत्कटता, शब्दफेक, विविध रसांची अभिव्यक्ती, मुद्राभिनय आरोह- अवरोह, हातवारे इत्यादी गोष्टींची जाण असणे.

१७ अनेक मुलांचे घरी बोलल्या जाणा-या भाषेकडून प्रमाणभाषेकडे जे संक्रमण होणार असते.

## २.३ भाषिक कौशल्यांची पूरकता आणि विषयज्ञान (Complementarity of Language Skills and Subject Knowledge)

- हल्लीच्या बदलत्या जगात पारंपारिक शैक्षणिक क्षेत्रापलिकडे आर्थिक विस्तृत कौशल्यांची विद्यार्थ्यांना गरज आहे. अशी कौशल्य जी त्यांना वास्तव जीवन परिस्थितीत उपयोगी ठरू शकतील, एखादे कार्य पूर्ण करण्यासाठी बहुविध एकत्रिक कौशल्य असल्यास ते भविष्यात विविध परिस्थितीला सामोरे जावू शकतात.

Complementority म्हणजे पूरकता. भाषिक कौशल्यांमध्ये स्वतंत्र असे एक कौशल्य आपण वेगळे काढू शकत नाही. सर्व भाषिक कौशल्य एकात्म बनून व्यक्तीचे भाषिक प्राविण्य वाढवतात. उदा. एखाद्या प्रकल्पात मध्ये प्राचीन साहित्याचे भाषांतर करावयाचे आहे. या प्रकल्पासाठी नेमलेल्या गटात एक प्राचीन भाषा जाणणारा, एक स्थानिक माहितगार, एक वर्तमानकालीन भाषेतील तज्ज्ञ, एक संस्कृतीचा अभ्यासक अशा सर्व जणांचा गट ज्यात सर्वांची भाषा एक नाही मात्र त्यांचे भाषिक ज्ञान एकमेकांसाठी पूरक आहे हे विविध भाषिकांचे मिश्रण भाषिक कौशल्यांची पूरकता (Complementanity of Langauge Skills) दर्शविते.

- वर्तमान भाषा तज्ज्ञाला प्राचीन भाषा ज्ञान नाही संस्कृतीच्या अभ्यासकाला थोडी ओळख आहे. अशावेळी प्राचीन साहित्याचे भाषांतर करतांना दोन टप्पे केले जातील . १) मौखिक चर्चा, २) लिखित भाषांतर. मौखिक चर्चेदरम्यात एकमेकांजवळ असलेली भाषिक कौशल्ये परस्परांना पूरक ठरून चर्चा लिखित स्वरूपात मांडता येईल. पूरकता याच्या स्पष्टीकरणासाठी एक उदाहरण म्हणजे पहिल्या ठिकाणी ज्या वस्तूची गरज आहे त्या वस्तूचे दुस-या ठिकाणी उत्पादन होते. म्हणजे पहिल्या ठिकाणाच्या लोकांकडे पैसा आहे आणि दुस-या ठिकाणी त्या वस्तू या दोघांमध्ये पूरकता ही परिस्थिती आहे. आता संपूर्ण जगात या पूरकतेच्या तत्त्वावर सर्व व्यापार होत आहे. विविध स्थानांमध्ये जर असा कुठलाही व्यवहार होत नसेल तर त्या ठिकाणांची पूरकता शुन्य आहे असे म्हणावे लागते.

क्रमश:

- श्रवण, भाषण, वाचन, व लेखन ही कौशल्ये परस्परांवर आधारित परस्परांना पूरक कौशल्ये आहेत. विद्यार्थ्यांचे विषयज्ञान विस्तारण्यासाठी या पूरकतेचा उपयोग शिक्षक करीत असतो. उदा. श्रवण कौशल्य विकासासाठी दैनंदिन अध्यापनाव्यतिरिक्त विविध तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने विद्यार्थ्यांना ऐकवणे, चर्चा आयोजित करणे अशा उपक्रमांतधून विद्यार्थ्यांच्या श्रवणाबरोबरच भाषण कौशल्याचा विकास होतो. भाषणासाठी विद्यार्थ्यांच्या श्रवणाबरोबरच भाषण कौशल्याचा विकास होतो. भाषणासाठी विद्यार्थ्यांना विविध माहिती मिळवावी लागते. ही माहिती मिळवण्यासाठी वाचन करणे, टिपणे काढणे या क्रिया केल्या जातात. यातून त्यांचे वाचन व लेखन कौशल्य विकसित  होते. असे अनेक उपक्रम शाळांमध्ये आयोजित करण्यात येतात जे विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्ये विकास आणि विषयज्ञानात भर टाकण्यात पूरक ठरतात.

## २.४ वर्गाती भाषिक विविधतेचा परिणाम (Impact of Language Diversity in Classroom)

- भाषिक विविधता

**Gollnick &Chinn (२००६) -** Language can be defined as a means of communication that shapes cultural and personal identity and socializes one into a cultural group.

भाषा ही संप्रेषणाचे असे साधन आहे जे सांस्कृतिक आणि वैयक्तिक ओळखीस आकार देते आणि सांस्कृतिक गटात सामाजिकता प्रदान करते.

Students whose first language is either a language other than medium of instruction or a language other than the mainstream language used in schools.

विद्यार्थ्यांची प्रथम भाषा ही अध्ययनाच्या माध्यमापेक्षा वेगळी असेल किंवा शाळेमध्ये उपयोगात येणा-या मुख्य प्रवाहरतील भाषेपेक्षा भिन्न असेल अशा विद्यार्थ्याला भाषिक विभिन्नत्व असलेला विद्यार्थी म्हणून ओळखले जाते. भारतातील शाळांमध्ये असे भाषिक भिन्नता असणारे विद्यार्थी खूप संख्येने आढळतात.

क्रमश:

## • भाषिक विविधता

प्रत्येक बालकाची भाषिक कौशल्ये, क्षमता, अनुभव, या दृष्टिकोनातून पार्श्वभूमी भिन्न असते. तसेच त्यांच्या अंगी असलेल्या अध्ययन कौशल्यांमध्ये विविधता असते. भाषिक विविधता ही मालमत्तेची स्वीकारलेली कल्पना, आरोग्याची काळजी, अन्न, बालके, शक्ती/ सामर्थ्य आणि वादविवाद यांच्याशी संबंधित आहे. भाषिक विविधतेची हानी आपली स्वीकारण्याची क्षमता कमी करते कारण जे सांगितले त्या ज्ञानाची जोडणी करण्याची क्षमता वाढवते. भाषासंपर्काच्या प्रक्रियेत दोन परस्पराविरोधी प्रेरणाही कार्यरत होत असतात.

## वर्गखोलीतील भाषिक विविधता

- समुदायानुसार भाषा उदा. ग्रामीण, आदिवासी समूह
- वर्ग - उच्च, मध्यम, निम्न यानुसार भाषा
- जातीनुसार भाषा
- धर्मानुसार भाषा
- संस्कृतीनुसार भाषा
- व्यवसायानुसार भाषा
- प्रदेशानुसार भाषा
- अपंगत्व प्रकारानुसार भाषा उदा. मूकबधिरांची खुणांची भाषा, अंधांसाठी ब्रेल लिपी.
- विद्यार्थ्यांची वयोगटानुसार भाषा

# प्रकरण ३ रे भाषा आणि समाज (Language and Society)

३.१ प्रादेशिक विविधता (Regional Variations)

- समाजामध्ये ऐक्याची भावना निर्माण करणारा प्रभावी घटक म्हणजे भाषा होय. समान भाषा असलेल्या लोकांमध्ये ऐक्याची भावना निर्माण होते. येथे १९२८ साली सर्वपक्षीय परिषदेने पं.मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांना मूलभूत हक्कांवर आधारलेली स्वराज्याची घटना तयार करण्यासाठी समिती नियुक्त केली. सर तेजबहादुर सप्रू मा.श्री.अणे, ना.म.जोशी, सर अली इमाम हे सा समितीचे सदस्य होते. नेहरू रिपोर्ट या नावाने ओळखल्या जाणा-या या रिपोर्टमध्ये भाषावार प्रांतरचना या मुद्यावर स्वतंत्र प्रकरण असून लोकमत आणि भाषिक एकात्मता या दोन तत्त्वावर राज्यांची पुनर्रचना करण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली आहे. जेथे परकीय भाषेतून शासन व्यवहार होतात, तेथे लोकशाही नांदणे शक्यच नाही त्यामुळे लोकशाही नांदण्यासाठी भाषावार प्रांतरचना आवश्यक आहे, अशी समितीची धारणा या अहवालात मांडण्यात आली आहे. सामान्यत: त्या त्या भाषिकांची एक विशिष्ट संस्कृती असते, विशिष्ट परंपरा असते, त्यांचे विशिष्ट वाङ्मय असते. भाषावर प्रांतरचना

झाल्यास, या गोष्टी त्या प्रांताची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यास सहाय्यभूत होतील. शिक्षण, शासनव्यवहार आणि व्यापार प्रांतातील बहुजनसमाजाच्या भाषेतून झाला तर त्या प्रांतातील बहुजनसमाजाच्या भाषेतून झाला तर त्या प्रांताचा विकास स्वाभाविकपणे होईल अशा शब्दात समितीने भाषावर प्रांतरचनेमागचे वैचारिक सूत्र स्पष्ट केले होते.

- धार्मिक, सांस्कृतिक, भाषिक, प्रादेशिक विविधता असूनही या सर्व विविधतेतून एकतेच्या भावनेने राहण्याची प्राचीन परंपरा भारताला लाभलेली आहे. भाषावार प्रांतरचना झाल्याव, या गोष्टी त्या प्रांताची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यास सहाय्यभूत होतील. इतर देशांच्या मानाने भारतातील विविधता जास्त आहे. भारतात देखील मातृभाषेच्या प्रभावाने इंग्रजी बोलण्यात विविधता जाणवते. प्रादेशिक भाषाच्या विविध बोली त्या त्या विभिन्न प्रदेशानुसार भिन्न भिन्न आहेत.

## वर्गखोलीतील भाषिक विविधतेचा परिणाम

- वर्गाती आंतरव्यक्तिक संबंधावर परिणाम
- प्रमाणभाषा ग्रहणात व्यत्यय
- भाषिक कौशल्ये विकासात त्रूटी
- विद्यार्थी - शिक्षक आंतरक्रियेत संभ्रम
- विद्यार्थी - विद्यार्थी आंतरक्रियेत संभ्रम
- भाषिक विषमतेचा प्रादूर्भाव
- वर्गातील अल्पसंख्याकांचे हक्क डावलले जातात
- बहुभाषिकता विकसित होते
- भाषा ग्रहणात विविधता आढळते
- औचित्यपूर्ण भाषाप्रयोगाकडे पुरेसे लक्ष देणे शक्य नसते
- विद्यार्थ्यांवर भाषा शिक्षणाचा ताण
- सामाजिक कौशल्यांचा विकास
- आकलन क्षेत्रावर परिणाम
- शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न

## प्रकरण ३ रे भाषा आणि समाज (Language and Society)

### ३.१ प्रादेशिक विविधता (Regional Variations)

- समाजामध्ये ऐक्याची भावना निर्माण करणारा प्रभावी घटक म्हणजे भाषा होय. समान भाषा असलेल्या लोकांमध्ये ऐक्याची भावना निर्माण होते. येथे १९२८ साली सर्वपक्षीय परिषदेने पं.मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांना मूलभूत हक्कांवर आधारलेली स्वराज्याची घटना तयार करण्यासाठी समिती नियुक्त केली. सर तेजबहादुर सप्रू मा.श्री.अणे, ना.म.जोशी, सर अली इमाम हे सा समितीचे सदस्य होते. नेहरू रिपोर्ट या नावाने ओळखल्या जाणा-या या रिपोर्टमध्ये भाषावार प्रांतरचना या मुद्यावर स्वतंत्र प्रकरण असून लोकमत आणि भाषिक एकात्मता या दोन तत्त्वावर राज्यांची पुनर्रचना करण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली आहे. जेथे परकीय भाषेतून शासन व्यवहार होतात, तेथे लोकशाही नांदणे शक्यच नाही त्यामुळे लोकशाही नांदण्यासाठी भाषावार प्रांतरचना आवश्यक आहे, अशी समितीची धारणा या अहवालात मांडण्यात आली आहे. सामान्यत: त्या त्या भाषिकांची एक विशिष्ट संस्कृती असते, विशिष्ट परंपरा असते, त्यांचे विशिष्ट वाङ्मय असते. भाषावर प्रांतरचना

झाल्यास, या गोष्टी त्या प्रांताची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यास सहाय्यभूत होतील. शिक्षण, शासनव्यवहार आणि व्यापार प्रांतातील बहुजनसमाजाच्या भाषेतून झाला तर त्या प्रांतातील बहुजनसमाजाच्या भाषेतून झाला तर त्या प्रांताचा विकास स्वाभाविकपणे होईल अशा शब्दात समितीने भाषावर प्रांतरचनेमागचे वैचारिक सूत्र स्पष्ट केले होते.

- धार्मिक, सांस्कृतिक, भाषिक, प्रादेशिक विविधता असूनही या सर्व विविधतेतून एकतेच्या भावनेने राहण्याची प्राचीन परंपरा भारताला लाभलेली आहे. भाषावार प्रांतरचना झाल्याव, या गोष्टी त्या प्रांताची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यास सहाय्यभूत होतील. इतर देशांच्या मानाने भारतातील विविधता जास्त आहे. भारतात देखील मातृभाषेच्या प्रभावाने इंग्रजी बोलण्यात विविधता जाणवते. प्रादेशिक भाषाच्या विविध बोली त्या त्या विभिन्न प्रदेशानुसार भिन्न भिन्न आहेत.

## ३.२ जातीय बोली भाषा (Caste Dialects)

- सामान्यत: ज्या भाषाभेदांना लखनपरंपरा नाही व जे आपल्या अस्तित्वाम केवळ मौखिक परंपरेवर अवलंबून असतात अशा भाषाभेदांना बोली अशी संज्ञा आहे. बोली ह्या एकमेकींपासून त्यांच्यातल्या उच्चारवैशिष्टयांमुळे (ध्वनिविचार) शब्दविकारांमुळे (रूपविचार), वाक्यरचनांमुळे (वाक्यविचार) आणि शब्दसंग्रहांमुळे वेगळया ठरतात. महाराष्ट्राची भाषा मराठी नावाची संज्ञा असलेली भाषा आणि त्या भाषेखाली अनेक बोली त्या एकभाषक प्रदेशात वावरत असतात. व्यवहारात वापरल्या जाणा-या बोलीभाषा समाजगटानुसार भिन्न भिन्न आढळतात. आपल्याकडे बोलीबद्दलचे गैरसमज वाढण्याला आपल्याकडची सामाजिक रचनाच बव्हंशी कारणीभूत होती. भौगोलिक वैशिष्टयाच्या विस्तृत क्षेत्रफळाच्या आणि भरपूर लोकसंख्या असलेल्या प्रदेशातील मराठी भाषा सर्वत्र एकच रूप घेऊन वावरत असणे शक्य नाही. भाषा ही अनुकरणाने शिकली जाते. कुटुंबात मातृभाषेच्या समवेत मूल विकसित होत असते.
- व्यवसायपरत्वे जशी भाषेची वेगवेगळी रूपे आपणास आढळतात तशी जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये भाषेची वेगवेगळी रूप आढळतात. या भाषा भांडारात निरनिराळे व्यावसायिक शब्द कशी भर घालतात हे प्रथमत: आपण पाहूया.
- सोनार : बागेसरी, उजवणे, नळी वतनी, सवाणा, हरण, कान टोचणे.
- चांभार: कातडे, कमावणे, टीप शिवणे, सांधणे, घुना देणे, मोठ पाडणे.
- न्हावी : वस्तारा, कैची, मशीन, धोपटी, नराणी, पाणी लावणे, चंपी, हजामत इ.
- लोहार : पाणी देणे, शेवटणे, धार लावणे, घण मारणे, भाता मारणे इ.
- तेली : घाणा, ठोक, लाट, कुपरी, हत्ती, जांगी, चौकट इ.
- व्यापार : पाला करणे, मुंडाफोड करणे, वधारणे, तेजी, मंदी इ.
- सुतार : करवत, कानस, पटाशी, किकरे, वाकस, रंधा, पक्कड, हातोडी, पाचर, कराळ, श्याव, कानं इ.
- शेती : नांगरणी, लोढणे, पाळी, पेरणी, सरी, वाफा, लागवड, कोळपणी, कुळव, नांगर, कोरडवाहू, बागायती, रब्बी, खरीप, उपपणे, ठिबक सिंचन, वसाण इ.
- शिंपी : दोरा, सुई, बटण, काझी, बक्कल, शिलाई, दंड मारणे, टाचा मारणे, टीप मारणे इ.

उदा. राजकीय क्षेत्र, आरोग्य क्षेत्र, अर्थकारण क्षेत्र, धर्मकारण क्षेत्र, शिक्षण क्षेत्र

## ३.३ प्रमाण बोली भाषा (The Standard Dialects)

- प्रमाण मानली गेलेली भाषा म्हणजे उच्चवर्णीयांची सामान्य व्यवहारातली भाषा असून ती लेखनात असून ती लेखनात वापनलेली, व्यासपीठावर बोलली जाणारी भाषा असते. ही एक थोडी कृत्रिम, मुद्दात शिकावी लागणारी भाषा असते, असे म्हणता येईल. याउलट बोली म्हणजे ज्याच्या त्याच्या वर्गाच्या व्यवहारात स्वाभाविकपणे वापरली जाणारी भाषा. ही भाषा काही वर्गांच्या बाबतीत प्रमाणभाषेच्या फार जवळची असते, तर काही वर्गांच्या बाबतीत ती फार दूरची असते.
- प्रमाण बोली परस्पराचा विनिमय सहज सुलभ करून असल्याने ती जवळची वाटते. **ती लिखित स्वरूपाची असल्याने प्रमाण बोलीहून प्रमाण भाषेची परिवर्तनशीलता ही कमी असते.** प्रमाण मानली गेलेली भाषा म्हणजे उच्चवर्णीयांची सामान्य व्यवहारातली भाषा असून ती लेखनात वापरलेली, व्यासपीठावर बोलली जाणारी भाषा असते. प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातले हे जवळदूरचे नाते ध्वनी, शब्द, रूपविचार आणि वाक्यरचना ह्या सर्व स्तरांवर असू शकते. **लेखनात वापरली जाणारी ही प्रमाणभाषा प्रत्यक्षात जशीच्या तशी बोलणारे कोणीही नसते**. व्यक्ती आपल्या व्यापक व्यवहारासाठी सर्व समाजाने प्रमाणभूत मानलेली भाषा वापरते आणि एरव्ही अपल मर्यादित परंपरागत स्थानिक बोलीचाच उपयोग करते आणि ह्यात अस्वाभाविक, अनैसर्गिक किंवा न पटण्यासारखे काहीही नाही. शासन व्यवस्थेची अधिकृत मान्यता ही प्रमाणभाषेला उपकारक असते. या**मुळे प्रमाणभाषा एकात्मतेचे प्रतीक, बनते**. समाजातील माणसाची स्वतंत्र प्रमाण बोली असते.

### ३.४ विभिन्नतेचे महत्त्वपूर्ण वैयक्तिक घटक : लिंगभेद, वय (Personal Factors Leading to Variability- Sex Differences, Age)

- **लिंगभेद :** मुळात स्त्रियांचे व पुरूषांचे भाषिक वर्तन वेगळे की नाही, हाही वादाचा विषय होता. नैसर्गिक मानल्या गेलेल्या गुणधर्मांच्या बाबतीतही अशी परिस्थिती असली, तरी अन्य भाषिक घटकांच्या बाबतीतही सामाजिक प्रतिमा, अपेक्षा, दडपणे इ. चा परिणात होणे. स्वाभाविक आहे. त्यामुळे स्त्रियांची भाषा व पुरूषांची भाषा अशा त-हेचे शब्दप्रयोग व्हावेत, इथपर्यंत भिन्नता काही समाजामध्ये दिसून येते. भाषेतील व्याकरणिक व्यवस्था तिच्यातील लिंगदर्शक घटकांची व्यवस्था यामुळेही स्त्रियांचे व पुरूषाचे बोलणे वेगळे वाटते. एकूणातच समाजातील मूल्ये, औचित्याचे संकेत यांच्या जपणुकीच्या अपेक्षा स्त्रियांकडून अधिक प्रमाणात केल्या जातात. लहानपणापासूनच हे समाजाचे दडपण त्यांच्या वर्तनावर परिणाम करू लागते. स्त्रीपुरूषांच्या बाबतीतील भाषाभेद समाजातील औचित्य कल्पनांशी निगडित आहे.
- **स्त्री- पुरूषांच्या भाषा वापरणे संदर्भातील विविध मार्ग :**

१. उच्चारणातील भेद

२. स्वरशैलीतील भेद

३. शब्दसंग्रहातील तफावत

४. वाक्यरचनेविषयी फरक

५. भाषाविषयीच्या दृष्टीकोनात फरक

६. अभाषिक फरक

७. विषय निवडीतील फरक

८. भाषिक लिंगभेदाच्या प्रेरणा

# प्रकरण ४ थे - शिक्षणातील भाषेचे महत्त्व (Significance of Language in Education)

## ४.१ वाचन व लेखनातील भाषेचे महत्त्व (Significance of Language in Reading & writing)

१. **विषय प्रवेश:** मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. त्यामुळे व्यक्ती व समाज या दोघांचा घनिष्ट संबंध आहे. या समाजात विचारांची आदान - प्रदान करण्यासाठी भाषा हे फार महत्त्वाचे साधन आहे. मानवी उत्क्रांतीतून फक्त मानवालाच वाचाशक्ती प्राप्त झाली. वाचेचा उपयोग करून व्यक्तीने फार मोठी प्रगती साधली दैनंदीन जीवनात येणारे बरे-वाईट अनुभव त्याने भाषेचा उपयोग करून ग्रंथरूपात मांडले. प्रत्येक पिढीने या अनुभवांची जपणूक केली व नवीन अनुभवांची त्यात भर घातली. भाषा ही व्यक्तीला घडविणारे उपयुक्त साधन आहे. भाषेचा जसजसा विकास होत गेला तसतशी नवीन कौशल्याची त्यात भर पडत गेली. श्रवण, वाचन, लेखन, संभाषण ही भाषेची कौशल्ये आहेत. वैयक्तिक व सामाजिक व्यवहार सुरळीतपणे पार पाडण्यासाठी भाषेची फार मदत होते. यासाठी भाषेची प्राथमिक कौशल्ये आत्मसात करावी लागतात. भाषेच्या विकासासाठी या कौशल्यांचा विकास होणे गरजेचे आहे.

- **वाचन कौशल्यातील भाषेचे महत्त्व :**

१. संबोध विकास

२. वाचनातून संभाषण व लेखनात सुधार

३. लिपीबध्द भाषेतील प्रतिभाशक्ती जागृत करणे

४. वाचनातून भाषिक आशयाशी समरसता

५. वाचाल तर वाचाल

६. भाषा क्षमता विकसनासाठी वाचन

## ४.१.२ लेखनातील भाषेचे महत्त्व (Significance of Language in Writing)

- **आपल्या मनातील विचार इतरांना सहज समजतील अशा त-हेने योग्य शब्दात लिहीणे म्हणजे लेखन कौशल्य होय**. लेखनप्रक्रिया होण्यासाठी प्रथम माहितीचे ग्रहण, आकलन व्हावे लागते. आकलनासाठी पुन्हा पुन्हा वाचन, श्रवण, व चिंतन व्हावे लागते. मनात निश्चित हेतू ठेवून आत्मविश्वासाने, संदर्भ पुरेसे तयार झाल्यावर व भाषिक तयारी असल्यास लेखन होते. आपले मत, मिळवलेले ज्ञान अनुभव विचार व्यक्त करण्यासाठी लेखन कौशल्याचा उपयोग होतो.

इंग्रजीत म्हटले जाते.

When I hear, I forget,

When I see, I remember

But, when I do, I understand.

म्हणजेच व्यक्ती जरी ऐकून, वाचून, पाहून ज्ञान मिळवत असला तरी जोपर्यंत तो लिहून ठेवत नाही किंवा समजलेले आपल्या भाषेत मांडत नाही, तोपर्यंत ज्ञान आत्मसात होत नाही. अध्ययनप्रक्रियेचा एक भाग म्हणून लेखन कौशल्याला महत्त्व आहे.

- **लेखनातील भाषेचे महत्त्व**

**१. माहितीचे सुसूत्रीकरण २. समाज उद्बोधन ३. समस्या निराकरण ४. पुनरावलोकन/ संदर्भ ५. माहितीचे जतन ६. वेळ वाचण्यासाठी वेळेची बचत ७. व्यवहार सुकर होण्यासाठी ८. आत्मविष्कार व स्वयंमूल्यमापन**

## ४.२ लिखित भाषा वाचनासाठी कार्यनीती (Strategies for Reading the Text)

- **विषय प्रवेश:** वाचन ही योजनापूर्वक कृती आहे. वाचन काहीतरी जाणून घेण्यायाठी केले जाते. म्हणजेच व्यक्तीला काही माहिती हवी असते. काही स्पष्ट करायचे असते काही तपासायचे असते त्यावेळी तो वाचन करतो. व्यक्तीची बौध्दीक पात्रता वाढवण्यासाठी व स्वत:ची गुणवत्ता वाढवण्यासाठी वाचन महत्त्वाचे आहे.

वाचन कौशल्य क्षेत्रात वाचकांच्या सवयीनुसार नाट्यमयरित्या बदल होत आहेत. उदा. आधीच्या काळात विविध लिखित, छापील साहित्य वाचण्यावर भर होता. आता सर्व छापील साहित्य ऑनलाईन हवे तेव्हा उपलब्ध आहे त्यात गरजेनुसार शॉर्टकटस आलेत. हे सर्व वाचकाच्या सुविधेसाठी घडत आहे. आमच्या ज्ञानधिष्ठित समाजात ज्या वाचकाला सक्रीय सहभाग घ्यावयाचा आहे त्याला ग्रहणशील कौशल्यांपेक्षा अधिक बाबी गरजेच्या आहेत. छापील आणि डिजिटल भाषा वाचनात आमची पिढी कुठेही कमी नाही. वाचनातून चिकित्सक विचार कौशल्य विकसित होते.

- **वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी तंत्रे व कृती :**

१. भाकीत करणे २. शब्द व चित्र जोड्या लावणे ३.वाक्ये व चित्र जोड्या लावणे ४. अर्धवट वाक्य जोड्या ५. सामाजिक संप्रेषण ६. विचार शक्तीस सहायक ७. आत्मविश्वास प्राप्ती ८. व्यक्तिमत्व विकास ९. प्रश्न व उत्तर जोडया लावणे १०. संभ्रमित करणारा परिच्छेद ११. कृती १२. ग्रंथालय १३. स्पर्धाचे आयोजन १४. वाचन खेळ

## ४.३ लेखन कौशल्यासाठी कार्यनीती (Strategies for Writing the Text)

लेखन ही ठरवून केलेली बौध्दिक प्रक्रिया आहे. लेखन ही नैसर्गिक प्रक्रिया नाही. प्रत्येक व्यक्तीला कसे लिहावे ही शिकवावे लागते.

बेकन यांच्या मते, Reading make a full man & writing make an exact man.

महात्मा गांधीजींच्या मते, Fair &legible hand writing makes a man perfect in walks of life.

- **लेखनाचे महत्त्व: बो**लण्याप्रमाणेच लेखन हेही आत्माविष्काराचे एक प्रमुख साधन आहे. आपण स्वत: व आपल्याला प्रिय असणारी व्यक्ती, यांच्यामध्ये हजारो मैलांचे अंतर असले तरी आपल्या भावना व विचार त्यांना कळविण्याचे एक महत्त्वाचे सधन म्हणजेच लेखन.

कित्येक वेळा आपल्या भावना व विचारांचा ताण कमी करण्यासाठीही आपण आपले विचार लिहून काढतो. अनेक लोक यासाठीच रोजनिशी लिहितात. जीवनातील विविध अनुभव घेवून त्यांच्या । मनात जी खळबळ निर्माण झाली असेल अगर काही दृश्ये पाहून जे विचारतरंग त्यांच्या मनात उठले असतील त्यांचा अविष्कार आपल्या लेखनातून ते करतात. सामाजिक दृष्टीनेही लेखनाचे महत्त्व फार आहे. वृत्तपत्रे, साप्ताहिके व मासिके यांतून केल्या जाणा-या लेखनातून नानाविध मते लोकांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न चालू असतो. लोकशाही समाजाचा नागरिक नुसता साक्षर असून चालत नाही, तो सुसंस्कृतही असावा लागतो.

लेखनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वर्तमान, भूत व भविष्य या तीनही कालांना साधणारा तो एक पूल आहे. लोकहितवादींची शतपत्रे, मालाकारांचे निबंध याच दृष्टीने आज महत्त्वाचे वाटतात.

## ४.३.२ लेखन कौशल्य विकसनाची कार्यनिती / तंत्रे ( Strategies / Techniques to Develop Writing)

१. उपक्रम : एखादे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सतत केल्या जाणा-या कृतींचा समूह म्हणजे उपक्रम. दीर्घकाळापर्यंत क्रमबद्ध रितीने चालणा-या कृती म्हणजे उपक्रम. उपक्रम हे लेखी व मौखिक दोन्ही प्रकारचे असतात.

उदा. वर्तमानपत्रातील बातम्यांचे वाचन.

२. प्रकल्प (Project) : ठरवलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एखाद्या आशय विषयाचे विस्तृत अध्ययन क्रिया दिलेल्या प्रारूपात लेखन करणे म्हणजे प्रकल्प.

उदा. समानार्थी शब्दांचा संग्रह

शब्द समूहासाठी एक शब्द

चित्रकथा संग्रह, कविता, निबंध संग्रह इ.

३. नक्कल करणे (Copying) : प्राथमिक स्तरावर नक्कल करणे हे तंत्र उपयुक्त ठरते. उदा.

i) A,B, C, D किंवा अ, आ, ई सारखे नवीन अक्षरे फलकावर लिहून विद्यार्थ्यांना नक्कल करण्यास लावणे.

ii) अक्षरे जोडणे (Joining Words) :

उदा. Ta + ke = take

आ + ई = आई

क्रमश:

४. रूपांतरण (Conversion) : या कृतीमध्ये विद्यार्थ्याला भाषेच्या नियमांचा विचार करावा लागतो व त्यानुसार योग्य ती क्रिया करायची असते.

उदा. इंग्रजी भाषेसाठी Do as Directed- Change the voice, change the degree, Question tag etc.

मराठी भाषेसाठी, हिंदी भाषेसाठी प्रयोग बदला, काळ बदला, वाक्य चालवा

भाषेचे खेळ

संस्कृत भाषेसाठी : रूपे ओळखा, रूपे द्या, भाषांतर करा.

५. निबंध लेखन : १ नियंत्रित निबंध २ मुक्त निबंध ३ वर्णनात्मक निबंध ४ विवेचनात्मक निबंध ५ आत्मकथनात्मक निबंध ६ कल्पनात्मक निबंध ७ समीक्षात्मक निबंध ८ माहितीपर (लेख) निबंध ९ लघुनिबंध इ.

६. लेखन प्रकारानुसार उपक्रम : १ चित्रवर्णन २ प्रश्नोत्तर ३ रूपरेषा ४ व्याख्यान पद्धती ५स्वाध्याय पद्धत ६ उद्‌बोधन पद्धत / प्रेरणा ७ वादविवाद किंवा तार्किक विलास ८ रचना ९ भिन्नपत्रिका प्रदर्शन १० हस्तलिखित / नियतकालीक ११ हस्ताक्षर स्पर्धा १२ विद्यार्थ्यांचे लेखन व सहशालेय कार्यक्रम

## ४.४ सारांश लेखनात भाषेचे महत्त्व (Importance of Language in Summarizing the Text)

- एखाद्या माहितीचे, घटनेचे थोडक्यात स्मरणात राहण्यासाठी केलेले संक्षेपलेखन म्हणजे सार लेखन किंवा सारांशलेखन होय.
- **व्याख्या : सारांश लेखनाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे -**

१. एखाद्या वैचारिक, उता-यातील लेखकाचे विचार आपल्या शब्दात संक्षेपाने मांडणे यालाच सारांशलेखन म्हणतात.

२. मूळ मजकुराचा स्वत:च्या भाषेत संक्षेप करणे म्हणजे सारांशलेखन

३. उता-यातील मूळार्थांचे थोडक्यात कथन म्हणजे सारांशलेखन होय.

४. मूळ उता-यतील शब्द संख्येचा एक तृतीयांश आशयाची स्वतंत्रपणे केलेली मांडणी म्हणजे सारांशलेखन होय.

- सारांशासाठी इंग्रजीत Summary शब्द आहे. कोणत्याही मूळ पाठ्यांशाचे संक्षिप्त विवरण प्रस्तुत करणे म्हणजे सारांश. लेखनकलाच्या अंतर्गत सारांश लेखनाचा अंतर्भाव होतो. सारांशाचा उपयोग खूप क्षेत्रात केला जातो. संपादक, वार्ताहर, अधिकारी, लिपिक तसेच विशिष्ट प्रकारच्या लेखनासाठी सारांशलेखनाची गरज असते.
- सारांश लेखनासाठी उपयुक्त टप्पे: १ मूळ पाठ्यांशाचे सावधानीपूर्वक वाचन. २ योग्य शीर्षकाची निवड ३ मुख्य मुद्यांना अधोरेखित करणे. ४ पुन्हा वाचन ५ शब्दगणना आणि सारांशलेखनाचा आकार ६ सारांश लेखन.
- **वाचनाच्या दोन शैली** : १ स्कॅनिंग(Scanning) : बारकाईने तपासणे / पटकन पाहणे हे वाचनाचे एक तंत्र आहे. स्कॅनिंग म्हणजे माहीत असलेला भाग जलद वाचनाव्दारे शोधून काढणे होय.

  २ वरवर चाळणे (Skimming) स्किमींग हे जलद वाचनाशी संबंधीत आहे. वाचकाला मजकुरावरून पटकन नजर फिरवता आली पाहीजे.

### ४.४.४ सारांश लेखन करताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे

१. तटस्थता

२. स्पष्ट व सरळ भाष

३. विचारांची स्पष्टता व भाषा

४. विषयाची सर्वसमावेशक मांडणी

५. योग्य शीर्षक / उपशीर्षक

६. विषयाची परिच्छेदामध्ये विभागणी

७. सारांशलेखन व आकृतीरूप मांडणी